महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ. दा.नौ. मार्ग, मुंबई- ४०० ००१,
दूरध्वनी क्र.०२२- २२६२०२३१/३२, Email : higherartexam@gmail.com

क्रमांक :डिओए/एचएई-२०२०/चार/३८० दिनांक : २२/०९/२०२०

**<u>परीक्षा प्राथम्य/कालमर्यादित</u>**

प्रति,

१) अधिष्ठाता, सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई.
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर.
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद.
४) प्राचार्य, सर्व शासनमान्य अशासकीय कला महाविद्यालये.

विषय : **शासकीय उच्चकला परीक्षा- २०२०**
ATKT/REPEATER विद्यार्थ्यांच्या परीक्षा नियोजनाबाबत.

पदविका अभ्यासक्रमांमधील ए.टी.डी. प्रथम वर्ष, इंटरमिजिएट (रेखा व रंगकला, उपयोजित कला व शिल्पकला) या परीक्षेतील ATKT/REPEATER असलेल्या विद्यार्थ्यांची (विद्यार्थ्यांना ज्या विषयात ATKT लागली असेल अथवा ज्या विषयात ते अनुत्तीर्ण झाले असतील अशा REPEATER ) प्रात्यक्षिक (Practical) परीक्षा ऑनलाईन प्रणालीद्वारे तोंडी पध्दतीने त्या त्या विषयातील प्रश्न विचारुन संस्था स्तरावर घेण्यात यावी व गुणदान करण्यात यावे. शक्य नसल्यास टेनिफोनिक पध्दतीने सदर प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात यावी.

तसेच उपरोक्त परीक्षांमधील सैध्दांतिक (Theory) विषयांच्या प्रश्नपत्रिका बहूपर्यायी /वैकल्पिक (MCQ) स्वरुपात संस्था स्व स्तरावर तयार करण्यात याव्यात. सदर प्रश्नपत्रिकेत प्रत्येक प्रश्नाला ४ पर्यायी उत्तरे देण्यात यावी. अभ्यासक्रमनिहाय बहूपर्यायी /वैकल्पिक (MCQ) प्रश्नपत्रिका खालीलप्रमाणे तयार करण्यात यावी.

१) ए.टी.डी. प्रथम वर्ष (थेअरीचे तीन विषय): ५० प्रश्न व प्रत्येकी २ गुण = एकुण गुण १००
२)इंटर.ड्राईंग अॅन्ड पेंटींग : History Of Art - ५० प्रश्न व प्रत्येकी २ गुण = एकुण गुण १००
Asthetics - २५ प्रश्न व प्रत्येकी २ गुण = एकुण गुण ५०
३) इंटर अप्लाईड आर्ट (थेअरीचा एक विषय) : ५० प्रश्न व प्रत्येकी २ गुण = एकुण गुण १००
४) इंटर स्कल्प्चर : History Of Art - ५० प्रश्न व प्रत्येकी २ गुण = एकुण गुण १००
Asthetics - २५ प्रश्न व प्रत्येकी २ गुण = एकुण गुण ५०

उपरोक्त प्रश्नपत्रिका सोडवण्याचा कालावधी १०० गुणांना १.३० व ५० गुणांना १.०० तास इतका देण्यात यावा. सदर विद्यार्थ्यांची परीक्षा त्यांना प्रत्यक्ष परीक्षा केंद्रावर न बोलावता आपण दिलेल्या वेळेत व्हॉटसअॅप द्वारे प्रश्नपत्रिका पाठवून घेण्यात यावी. लाईन असलेल्या फुलस्पेकवर प्रश्न व त्याखाली पर्यायी एक उत्तर अशी सोडविलेली संपूर्ण उत्तरपत्रिकेचे फोटो विदयार्थ्याकडून प्राचार्यांनी व्हॉटसअॅप/ईमेल द्वारे घ्यावेत. महाविद्यालय स्तरावर प्राचार्यांचे अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती नेमावी. सदर समितीने मुल्यमापन करुन संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या निकालपत्रकात त्याच विद्यार्थ्यांचे गुण (मागील व आताचे), खाडाखोड न करता अचूकपणे टक्केवारी व वर्ग/श्रेणीसहीत नमुद करावे व परिपूर्ण भरलेले निकालपत्रक समितीच्या स्वाक्षरीसह कला संचालनालयाकडे स्पीडपोस्टने दिनांक ०५/१०/२०२० पर्यंत पाठवावे. तसेच परीक्षाबाबतचे सर्व नोंदी/रेकॉर्ड संस्थांनी त्यांचे स्तरावर जतन करुन ठेवावे.

कला महाविद्यालयाच्या प्राचार्यांना काही शंका /समस्या असल्यास त्यांनी सहायक निरिक्षक श्री. संदिप डोंगरे (मोबाईल क्र. ९४२२३३२४१९), श्रीमती आरती श्रावस्ती (मोबाईल क्र.९८२०४०२६२२), श्री. अनिल सोनवणे (मोबाईल क्र.९४२१५१४५४२) यांचेशी संपर्क साधून परीक्षा सुरळीत व वेळेत पार पडतील याबाबत सहकार्य करावे. जेणेकरुन शक्य तितक्या लवकर निकाल जाहीर करणे सुलभ होईल.

(ना. म. वाघमोडे)
परीक्षा नियंत्रक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.